## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला ई ब्लॉक , सी २२, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com


जावक क्र. ७५२ /२०२४
आरोग्य-२०२४/प्र.क्र.०९/योजना-०६ दिनांक:- 24 JUL 2024

### सुधारीत कार्यारंभ आदेश

**प्रति,**

असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट (मार्केटिंग)
मे. एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड, (भारत सरकार उद्योग)
एच एल एल भवन पुजापुरा
तिरूअंनतपुरम, केरळ.

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता "तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजना" राबविण्याचा सुधारीत कार्यारंभ आदेश.**

**संदर्भ :-**
१. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र७७/कामगार-७ दि.०७.०८.२०२३
२. शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-०७ दि.०९.०१.२०२४
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई व मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यातील विषयाकित प्रकरणी करण्यात आलेला करारनामा दि.२१.०२.२०२४
४. या कार्यालयाचे कार्यादेश जावक क्र.२८६१/२०२४ आरोग्य-२०२४/प्र.क्र.०९/योजना-०६ दि.२१.०६.२०२४
५. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१) /काम-७ दि.१०.०७.२०२४
६. शासन निर्णय, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र. इबांका-०५२३/प्र.क्र७७ (भाग-१)/कामगार-७ दि.१२.०७.२०२४

**महोदय,**

मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगारांची व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांची मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत "तपासणी ते उपचार" (Test to Treat) आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीकरीता संदर्भ क्र. ०३ अन्वये आपल्या संस्थेशी

करारनामा करण्यात आला असून संदर्भिय ०४ च्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

शासनाच्या संदर्भिय ०५ च्या पत्रान्वये मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार योजना राबविण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेशी करारनामा करून कार्यारंभ आदेश जारी करण्यात आलेले आहे. संदर्भिय ०६ रोजीच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार सदर योजना मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) व मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी दि.०८.०१.२०२९ पर्यंत संयुक्तपणे राबवावयाची आहे. त्याकरीता सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार दोन्ही संस्थामध्ये योजनांची अंमलबजावणी करीता जिल्हयाची विभागणी करण्यात येत आहे. त्यामुळे तपासणी ते उपचार योजनेची अंमलबजावणीकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. संदर्भिय ०१ व ०२ च्या शासन निर्णयान्वये तपासणी ते उपचार आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीकरीता पाच वर्षाच्या कालावधीकरीता (दि.०९.०१.२०२४ ते दि.०८.०१.२०२९) आपल्या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनापैकी एक योजना निवडण्याचा विकल्प बांधकाम कामगारास असल्याने व त्यास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नसल्याने संबंधित संस्थानी बांधकाम कामगार नोंदीत जिवित (सक्रीय) उपचाराकरीता रुग्णालयात दाखल झाल्यास नोंदणी जिवित असल्याची खात्री करण्यासोबतच दुबार लाभ टाळण्याकरीता बांधकाम कामगाराकडे आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या कार्डव्दारे (आभा कार्ड) बांधकाम कामगाराने महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभ घेतला नसल्याचे तपासता येईल. भविष्यात दुबार लाभ टाळण्याकरीता संबंधित संस्थेने एखादया बांधकाम कामगाराकडे आभा कार्ड नसल्यास ते उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.
२. संदर्भिय ०६ च्या शासन निर्णयान्वये तपासणी ते उपचार आरोग्य योजना आपल्यासह संयुक्तपणे राबविण्याकरीता मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
३. उपरोक्त नमूद केल्यानुसार ज्या जिल्हयामध्ये योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे अशा जिल्हयातील कार्यरत फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) आपल्या संस्थेने मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) हस्तांतरीत कराव्यात. तसेच आपल्या संस्थेशी केलेल्या करारनाम्यानुसार करार कालावधीनंतर या बाबी मंडळाकडे हस्तांतरीत कराव्यात.

४. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) व समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल-फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) यांच्या संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांची असल्याने दि.०१.०८.२०२४ पासून वरील सेवा मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात.

५. संदर्भिय ०६ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत टप्या टप्याने जिल्हामध्ये रूग्णालय उभारणी करण्यात येणार असल्याने जस जसे या आदेशानुसार मे. एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड, (भारत सरकार उद्योग) यांचेकडे योजनेच्या अंमलबजावणीकरीता वर्ग करण्यात आलेल्या जिल्हयामध्ये रूग्णालय कार्यान्वित होतील तस तसे त्या जिल्हयातील योजनेची अंमलबजावणी मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत करण्यात येईल. त्याकरीता स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि.०७.०८.२०२३, ०९.०१.२०२४ व दि.१२.०७.२०२४ मधील अटी व शर्ती कार्यारंभ आदेशास लागू राहतील.

७. मंडळ व मे. एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड, (भारत सरकार उद्योग) यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.२१.०२.२०२४ अन्वये करण्यात आलेल्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती सदर कार्यारंभ आदेशास लागू राहतील.

८. मंडळाच्या दि.२१.०२.२०२४ रोजीच्या कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती सदर कार्यारंभ आदेशास लागू राहतील.

(विवेक कुंभार)
**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

**प्रत** :-

१. मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. प्रधान सचिव, (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

४. अप्पर कामगार आयुक्त, मुंबई कोकण विभाग/ पुणे/ नागपूर

५. कामगार उप आयुक्त, मुंबई शहर/मुंबई उपनगर (पुर्व)/ मुंबई उपनगर (पश्चिम) नाशिक/ औरंगाबाद/ पालघर/ रायगड

६. सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी (सर्व जिल्हा कार्यालये) यांना उचित कार्यवाहीस्तव

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेमार्फत तपासणी ते उपचार आरोग्य योजना राबविणेकरीता जिल्हानिहाय तपशिल दर्शविणारे प्रपत्र**

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हयाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | कोकण विभाग | कल्याण |
| ०२. | | मुंबई शहर |
| ०३. | | मुंबई उपनगर (पुर्व) |
| ०४ | | मुंबई उपनगर (पश्चिम) |
| ०५. | | पालघर |
| ०६. | | पनवेल |
| ०७. | | रत्नागिरी |
| ०८. | | सिंधुदुर्ग |
| ०९. | | ठाणे |
| १०. | नागपूर | भंडारा |
| ११. | | चंद्रपूर |
| १२. | | गडचिरोली |
| १३ | | गोंदीया |
| १४. | | नागपूर |
| १५. | | वर्धा |
| १६. | नाशिक | अहमदनगर |
| १७. | | धुळे |
| १८. | | जलगाव |
| १९. | | नंदूरबार |
| २०. | | नाशिक |